| MHND190011892026 | **इतर फौजदारी किरकोळ अर्ज क्र. १२३/२०२६**<br>नफिस इस्लामुदीन मार्फत मुख्त्यारआम मो. शौकीन<br>वि.<br>महाराष्ट्र शासन |
|---|---|

## निशाणी १ खालील आदेश

**१.** अर्जदार नफिस पि. इस्लामुदीन रा. ग्राम टोडा, रतनपुरी, तहसिल बुढाना, जि. मुझफरनगर मार्फत मुख्त्यारआम मो. शौकिन पि. मो. इलियास धंदा चालक, रा. खतौला, मजफफरनगर हरसौली उत्तर प्रदेश २५१००१ यांनी सदरचा अर्ज हा भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम ५०३ नुसार दाखल केलेला आहे. अर्जदाराने असे कथन केले आहे की, त्यांच्या मालकीचा GOOD CARRIER EICHER PRO 3018XP PLUS M HSD या कंपनीचे वाहन ज्याचा रजि. क्र. UP-12-DT-8706 चेसीस क्र. MC2CBMRC0TL143659 इंजिन नं. E426CDTL555450 हा आहे असा आहे. सदर वाहन पोलीस ठाणे, सोनखेड यांनी भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३१८ (४), २२३ बि. एन. एस. २०२३ प्रमाणे दाखल गुन्हयात जप्त केला आहे. त्यानुसार **गु.र.नं.१८५/२०२६** दाखल झाला आहे. अर्जदाराच्या कथनानुसार सदर वाहनाचे मालक असून त्यांनी त्यांच्या कुटुंबाच्या उदनिर्वाह सदर वाहनावर अवलबुंन आहे. तसेच सदरचा वाहन हा पोलीस स्टेशनला पडून राहील्यास त्यातील स्पेअर पार्ट खराब होऊन त्याचे मोठया प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरहू हायवा हा सुपूर्तनाम्यावर मिळणेकरीता त्यांनी विनंती केली आहे.

**२.** सरकारी वकीलांनी त्यांचे म्हणणे दाखल केले त्यांचे म्हणण्यानुसार सदर गुन्हात वापरलेले वाहन असुन वाहनांची नोंदणी आरोपीच्या नावावर नसून इतर व्यक्तीच्या नावावर असल्याचे कागदपत्रावरून दिसते. जप्त मुदेमाल विश्लेषणासाठी पाठविण्यात आलेला असून त्याच्या अहवालात विसंगती असल्याचे दिसुन येते. तसेच वाहन सोडल्यास अशाच प्रकारच्या गुन्हात पुन्हा वापरू शकते. वाहनांचे स्वरूप बदलण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदरहू वाहन अर्जदाराचे ताब्यात देऊ नये अशी त्यांनी विनंती केली. तर तपास अधिकारी यांनी त्यांचे म्हणणे नि.०५ वर दाखल करुन त्यांनी वाहन हे बाहेर राज्यातील असुन न्यायालयांनी दिलेल्या अटीचे व नियमाचे अधिन राहुन यापुढे योग्य तो आदेश होणेस विनंती केली आहे.

३. दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकला. दाखल कागदपत्रांची पाहणी केली. सरकारी वकीलांनी युक्तीवाद केला की, अशाच प्रकारचे इतर गुन्हे वाहनावरती असु शकतात. तसेच वाहनामध्ये फेरबदल करून वाहनामध्ये बदल करू शकतात त्यामुळे वाहन परत करण्यास विरोध केला. तसेच मा. सर्वोच्य न्यायालयाने Sunderbhai Ambalal Desai Vs. State of Gujarat, reported in AIR 2003 SC 638 या न्यायनिवाडयामध्ये वाहन हे पोलीस स्टेशनला जमा राहिल्यास ते खराब होवू शकतात व त्याचा ताबा लवकरात लवकर अर्जदार किंवा मालक यांना देण्यात यावा असे सुचविले आहे.

४. अर्जदाराने प्रकरणामध्ये सदरहू हायवा वाहनाचे आर. सी. बुक, स्वत:चे आधारकार्ड, पॉवर ऑफ ॲटर्नी व प्रथम खबर अहवाल यांची प्रमाणित प्रत दाखल केली आहे. तसेच ऑनलाईन विम्याची कागदपत्र दाखल केले आहेत. सदर वाहनाच्या आर. सी. बुक वरून असे दिसुन येते की, अर्जदार हे सदरहू वाहनाचे मालक आहेत. त्यामुळे सदरहू वाहनाचा ताबा अर्जदारातर्फे त्याच्या मुख्त्यारधारकास देणे योग्य व न्यायोचित होईल. त्याचप्रमाणे मुख्य प्रकरणाचा निकाल लागण्याकरीता बराच कालावधी लागू शकतो. सदरहू वाहन हे पोलीस ठाणे, सोनखेड येथे असून तेथे एकाच ठिकाणी पडून राहिल्यास त्यातील इंजिन व इतर स्पेअर पार्टस खराब होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे अर्जदाराला सदरहू वाहन सुपूर्तनाम्यावर देणे उचित होईल. करिता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. निरीक्षक, पोलीस ठाणे, सोनखेड यांनी अर्जदार मुख्त्यारआम मोहम्मद शौकिन पि. मो. इलियास धंदा चालक, रा. खतौला, मझ्फ्फरनगर हरसौली उत्तर प्रदेश यास GOOD CARRIER EICHER PRO 3018XP PLUS M HSD या कंपनीचे वाहन ज्याचा रजि. क्र. UP-12-DT-8706 चेसीस क्र. MC2CBMRC0TL143659 इंजिन नं. E426CDTL555450 हे वाहन रक्कम रु.२५,००,०००/- (पंचविस लाख रुपये मात्र) च्या नुकसान भरपाई बंधपत्रावर (Indemnity Bond of Rs.500/-) व त्याचप्रमाणे तेवढेच रकमेच्या वैयक्तीक बॉन्डवर खालील अटीवर अधीन राहून द्यावे.

**अ.** अर्जदाराने सदरहू वाहन हे प्रकरणाचा निकाल लागेपर्यंत कोणालाही विकू नये व त्यामध्ये कुठलाही बदल करु नये.

**ब.** न्यायालय सांगेल त्यावेळी सदरहू वाहन हे न्यायालयात हजर करावे.

**क.** अर्जदाराने पुन्हा अश्या प्रकारच्या गुन्हात वाहन वापरू नये.

**३.** तपास अधिकारी यांनी सदरहू वाहनाचा विस्तृत पंचनामा करावा, तसेच वाहनाचे फोटो घेऊन सदर फोटोवर अर्जदार व स्वतःची सही करुन न्यायालयात दोषारोपपत्रासह दाखल करावे.

NIRANJAN BALASAHEB CHAVAN

Digitally signed by NIRANJAN BALASAHEB CHAVAN
Date: 2026.08.14 17:33:50 +0530

लोहा.
दिनांक : १४/०८/२०२६

**(निरंजन बा. चव्हाण)**
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, लोहा

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file judgment/order are same word to word, as per the original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | V. N. Devare |
| Court Name | : | Civil Judge Jr. Div., & Judicial Magistrate, F. C., Loha, Tq. Loha, Dist. Nanded. |
| Date | : | 14/08/2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | : | 14/08/2026 |
| Judgment/order uploaded on | : | 14/08/2026 |